**<u>प्रसिध्दीसाठी</u>**

**मुंबई,**
**दि.15.11.2019**

# <u>प्रेस नोट</u>

**<u>नागरी सहकारी बँकासंदर्भातील विधेयकास तीव्र विरोध – प्रा.संजय भेंडे</u>**

आगामी लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनात ज्या वित्तीय संस्थांचे संपूर्ण वित्तीय नियंत्रण व नियमन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अधिन नाही, अश्या संस्थांना **`बँक'** हा शब्द वापरण्यापासून बंदी घालण्याचा निर्णय व त्या संबंधातील विधेयक सरकार आणू इच्छिते आहे. या बदलास रिझर्व्ह बँक देखील अनुकूल आहे.

मल्टि स्टेट सहकारी सोसायटी कायद्याअंतर्गत येणाऱ्या नागरी सहकारी बँकांच्या नावातून **`बँक'** हा शब्द वगळण्याचे हे कारस्थान आहे. तसेच रिझर्व्ह बँक केवळ व्यापारी व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्याच हिताचा विचार करुन निर्णय घेते असा समज सर्व सामान्य जनतेच्या मनात येतो आहे. **<u>कारण हया सर्व सामान्य जनतेच्या सर्व बँकिंग गरजा व त्यांना अडीअडचणीला मदत केवळ सहकारी बँकेनीच केलेली आहे.</u>** खाजगी व्यापारी बँकांच्या हित – रक्षणासाठी हा निर्णय रेटणे सुरु आहे. असा आरोप प्रा.संजय भेंडे, संचालक (नॅफकॅब), सदस्य, प्रशासकीय मंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व अध्यक्ष, नागपूर नागरिक सहकारी बँक यांनी व्यक्त केले.

हा निर्णय घेताना केवळ नुकत्याच पंजाब महाराष्ट्र बँकेतील आर्थिक अपहाराला नजरेसमोर ठेवून विषय रेटला जात आहे. मात्र ज्या बँका रिझर्व्ह बँकेच्या संपूर्ण नियंत्रण व नियमानात आहे त्यांच्या आर्थिक बेशिस्तीकडे कानाडोळा केला जात आहे. केवळ नावातून बँक शब्द वगळून, होणारे गैरव्यवहार थांबतील व व्यावसायिक अभिगम येईल हा विचार मुळातच अव्यावहारीक व समस्येपासून पळवाट शोधणारा आहे.

मुळात बँकिंग नियमन कायद्यातील तरतुदी व त्यासाठी निर्धारित आर्थिक निकषांची पूर्तता केल्यामुळेच, रिझर्व्ह बँकेने प्रदान केलेल्या परवान्यानुसार या सर्व बँकांना त्यांच्या नावात **`बँक'** शब्द लावण्याची अनुमती प्राप्त झाली आहे.

दरवर्षी रिझर्व्ह बँकेतर्फे हाणाऱ्या वार्षिक परिक्षणात या बँका सदर निकष पूर्ण करतात. असा अहवाल त्यांना रिझर्व्ह बँकेकडून दिला जातो. त्यामुळे त्यांना बँक म्हणून सर्व निर्धारित आर्थिक व्यवहार **(समाशोधन परकीय विनिमयन आदि)** तसेच विविध ग्राहक सुविधा देण्याचे अधिकार रिझर्व्ह बँक अबाधितपणे सुरु ठेवते. याचाच विसर केवळ बंद केबिनमध्ये बसून असत्या तुघलकी सूचना करणाऱ्याला नाही असे दिसते.

जर बँक हा शब्द काढून टाकला तर या बँकेतील ग्राहक समाशोधनात कसे सहभागी होतील. येथून ज्यांनी विविध आर्थिक सुविधा उपलब्ध आहेत त्यांना कोणती पर्यायी व्यवस्था सरकार देवू शकणार आहे. याचा कोणताही विचार न करता हा बौध्दीक दिवाळखोरीचा निर्णय घेण्याकडे सरकार जे पाऊल उचलते आहे असे मत प्रा.संजय भेंडे यांनी व्यक्त केले.

या क्षेत्राने ग्रामीण आणि शहरी दोन्ही क्षेत्रात दिलेल्या योगदानाची मुळीच दखल नेहमीप्रमाणेच केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयातील आणि रिझर्व्ह बँकेच्या वरिष्ठ व्यवस्थापनातील अधिकाऱ्यांनी घेतलेली नाही. त्याचप्रमाणे सहकारी बँकांना इतर सर्व सार्वजनिक तसेच व्यापारी बँकाना लागू असणारी मार्गदर्शक तत्वे व दिशा – निर्देश शब्दश लागू केले आहेत याचा देखील उल्लेख सोयिस्करपणे वगळला अहे. याकडे त्यांनी विशेषात्वाने लक्ष वेधले आहे.

केंद्र सरकार व रिझर्व्ह बँक जर सहकारी क्षेत्राच्या हिताविरुध्द जाऊन हा निर्णय घेणार असेल तर राज्य व अखिल भारतीय स्तरावरील सर्व संघटना एकत्रितपणे याचा प्रखर विरोध करतील. तसेच वेळ पडल्यास प्रत्यक्ष रस्त्यावर येवून देखील या विधेयकाचा विरोध करण्यात येईल. हा सहकार क्षेत्राच्या अस्तित्वाचा विषय आहे. असे **स्पष्ट प्रतिपादन प्रा.संजय भेंडे यांनी केले आहे.**

**सोबत ःः प्रा.संजय भेंडे यांचा फोटो.**

.....

1) MSCB's Financial Parameters is Superior than National Average & Standards.

2) Opposes Bill in connection with the Urban Co-operative Bank's - Prop. Sanjay Bhende.

3) Naming Ceromany of Various Buildings of MSCB.

.....